प्रेस नोट दि - २०/०६/२०१९

## तडीपार गुंड ऋषिकेश ऊर्फ् सनी अनिल शिंदे यास गुन्हे शाखा युनिट - ३ ने केले जेरबंद

मा. अपर पोलीस आयुक्त, गुन्हे पुणे शहर यांनी पुणे शहरातील गुन्हेगारी समुळ नष्ट व्हावी व गुन्हेगारावर वचक बसावा म्हणून अभिलेखावरील फरार व पाहिजे आरोपी तसेच तडीपार इसम यांचा शोध घेऊन त्याचे विरुध्द कठोर कारवाई करण्याबाबत आदेश दिलेले आहेत. त्यानुसार पोलीस कारवाई चालु आहे.

दिनांक - २०/०६/२०१९ रोजी युनिट -३,गुन्हे,शाखे कडील पोलीस उप निरीक्षक किरण आडागळे व अधिनस्त पोलीस कर्मचारी खाजगी वाहनाने पेट्रोलिंग करीत असताना अपर सुपर महादेव मंदीराजवळ, बिबवेवाडी पुणे येथे पोलीस रेकॉर्डवरील व पुणे शहरातुन तडीपार केलेला इसम ऋषिकेश ऊर्फ् सनी अनिल शिंदे वय २२ वर्षे रा - अपर ओटा, २७६/ओ/६/१५ बिबवेवाडी पुणे हा मिळुन आला आहे. त्याचे विरुध्द महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम १४२ प्रमाणे कारवाई करणेत आली असुन त्यास बिबवेवाडी पोलीस स्टेशनचे ताब्यात देणेत आले आहे.

ऋषिकेश ऊर्फ् सनी अनिल शिंदे हा पोलीस रेकॉर्डवरील गुन्हेगार असुन त्याचे विरुध्द चोरी,खंडणी व शरीरा विरुध्दचे असे एकुण -३ गुन्हे दाखल आहेत. मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ - २ पुणे शहर यांनी त्यांचेकडील तडीपार आदेश क्रं - १७/२०१८ महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ५५ प्रमाणे दि - २१/०९/२०१८ रोजी पुणे शहर व पुणे जिल्ह्यातून एक वर्षा करीता तडीपार केलेले आहे.

सदरची कामगिरी गुन्हे शाखा, पुणे शहर चे प्रभारी अपर पोलीस आयुक्त अशोक मोराळे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे पुणे शहर श्री. शिरीष सरदेशपांडे सहायक पोलीस आयुक्त गुन्हे - १ पुणे श्री. समीर शेख यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा युनिट - ३ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. राजेंन्द्र मोकाशी, पोलीस उप निरी श्री. संजय गायकवाड, पोलीस उपनिरीक्षक किरण आडागळे, व पोलीस स्टाफ सपोफौ अनिल शिंदे, पोहवा/प्रविण तापकीर, संतोष क्षीरसागर, पो.शि.संदिप तळेकर, राहुल घाडगे यांनी केली आहे.